# नागपूर महानगरपालिका,नागपूर

Marathi letter 2014

## (आरोग्य विभाग)

कमांक :– एच.ओ./969/एम.सी./2014 दिनांकः– 25/8/2014

### आदेश

प्रति,

सहाय्यक आयुक्त तथा वार्ड अधिकारी,
झोन क्र. 1 ते 10,
महानगरपालिका नागपूर

**विषय :– प्लास्टर ऑफ पॅरिसच्या मुर्त्यां संबंधी कारवाई करण्याबाबत.**

**संदर्भः– मा. उच्च न्यायालयाचे आदेश दि. 11/09/2012.**

मा. उच्च न्यायालयाने पारित केलेल्या आदेशानुसार प्लास्टर ऑफ पॅरिसच्या मुर्त्यांची विक्री करतांना विक्रेत्यांनी पी. ओ. पी. मुर्त्यांची ओळख पटण्याकरीता मुर्तीच्या मागे लाल रंगाचे चिन्ह लावणे बंधनकारक केले आहे. मुर्ती विक्रेत्यांनी खरेदीदारांच्या माहिती करीता विक्री स्थळी फलक लावून त्यामध्ये ग्राहकांद्वारे खरेदी करण्यात येणा–या पी. ओ. पी. मुर्त्यांचे विसर्जन नागपूर महानगरपालिकेद्वारे तयार करण्यात आलेल्या कृत्रिम विसर्जन तलावातच करावे असे निर्देश आहेत. मा. न्यायालयाच्या आदेशाचे अनुपालन होत नसल्यास त्या दुकानातील मुर्त्या जप्त करण्यात याव्या व याकरीता पोलीसांची व पी. ओ. पी. मुर्ती ओळखणा–या तज्ञांची मदत घेण्यात यावी. जप्तीची कारवाई करतांना नागरीकांच्या धार्मीक भावना दुखावल्या जाणार नाही याची सुध्दा विशेष दक्षता घेण्यात यावी.

भारतीय दंड विधान कलम 277 प्रमाणे सार्वजनिक झरे अथवा जलाशयातील पाणी दुषित करणे दंडनीय अपराध असुन अश्या ठिकाणी विसर्जन झाल्यास संबंधीताविरुध्द पोलीस ठाण्यात तक्रार दाखल करण्यात यावी.

जोडपत्र– उपरोक्त प्रमाणे

आयुक्त
महानगरपालिका, नागपूर

प्रतिलीपी माहितीस्तव :–
मा. महापौर, म.न.पा. नागपूर
प्रतः–
1) उपायुक्त, (1) व (2) म.न.पा. नागपूर
2) अति. उपायुक्त (1) म.न.पा. नागपूर
3) उपसंचालक, आरोग्य विभाग, म.न.पा. नागपूर